पुण्य नगरी
www.epunyanagari.com
। बुधवार, २१ मे २०२५ । मुंबई | १

कूपन
पुण्य नगरी
दि. २१.०५.२०२५

# ६९ टक्के सार्वजनिक शौचालये पाण्याविना

## सार्वजनिक शौचालयांची स्थिती दयनीय, तर ६० टक्के शौचालये वीज जोडणीविना प्रजा फाऊंडेशनच्या अहवालातून समोर

। **मुंबई :** मुंबईत सार्वजनिक शौचालयांची स्थिती दयनीय आहे. २०२३ सालच्या आकडेवारीनुसार महानगरातील एकूण सार्वजनिक शौचालयांपैकी ६८०० म्हणजे ६९ टक्के सार्वजनिक शौचालयांमध्ये पाणी व ६० टक्के शौचालयांत वीज जोडणीच झालेली नसल्याचे प्रजा फाऊंडेशनच्या अहवालातून समोर आले आहे. यात स्त्रियांसाठी शौचालयांची संख्या अपुरी आहे. दर ४ सार्वजनिक शौचालयांतील केवळ १ शौचालय स्त्रियांसाठी उपलब्ध आहे. एकूणच लोकसंख्येच्या तुलनेत शौचालयांची संख्या कमी व असुविधांयुक्त असल्याचे निरीक्षण प्रजा फाऊंडेशनने मांडले आहे.

मुंबईत दिवसेंदिवस लोकसंख्या वाढते आहे. लोकसंख्येनुसार सार्वजनिक शौचालये कमी आहेत. मुंबईत एका सार्वजिक शौचालयाचा वापर करणाऱ्या पुरुषांची संख्या ८६ आणि स्त्रियांची संख्या ८१ आहे. मात्र, स्वच्छ भारत अभियानानुसार एका शौचालयाचा वापर करणाऱ्या





पुरुषांची संख्या ३५ आणि स्त्रियांची संख्या २५ असायला हवी. २०२३ च्या आकडेवारीनुसार दर ४ सार्वजनिक शौचालयांतील केवळ एक शौचालय स्त्रियांसाठी आहे. शौचालयांचा तुटवडा, त्यात पाणी जोडणी व वीज जोडणी नसलेल्या शौचालयांची संख्याही निम्म्याहून अधिक आहे. प्रजा फाऊंडेशनने मुंबईतील नागरी समस्यांची सद्यस्थिती २०२५ हा अहवाल मंगळवारी प्रेस क्लब येथे प्रसिद्ध केला. या अहवालात मुंबईतील स्वच्छता आणि वायू प्रदूषण समस्यांचा उहापोह करण्यात आला आहे. २०२४ मध्ये मुंबईकरांनी १.१५ लाखाहून अधिक तक्रारी नोंदवल्या आहेत. तक्रारसंख्येत २०१५ च्या तुलनेत ७० टक्के इतकी मोठी वाढ झाली आहे. मागील १० वर्षांतील तक्रारींच्या घेतलेल्या आढाव्यानुसार घनकचरा तक्रारी ३८० टक्क्यांनी वाढल्या. तर प्रदूषणासंदर्भातील तक्रारी ३३४ टक्क्यांनी वाढल्या असल्याचे श्रेयस चोरगी यांनी सांगितले.

नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निवारण होईल याची खबरदारी घ्यावी आणि नागरिकांचे अभिप्राय घेऊन पारदर्शकता वाढवावी. तसेच मुंबई महापालिकेच्या पर्यावरण अहवालातील आकडेवारी आणि माहिती अधिकारातील प्राप्त आकडेवारी यामध्ये विसंगती दिसत असून ही बाब चिंताजनक असल्याचे प्रजा फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद म्हस्के यांनी म्हटले आहे.

### स्त्रियांसाठी शौचालये कमीच

मुंबईत स्त्रियांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आवश्यक तितक्या संख्येने सार्वजनिक शौचालये उपलब्ध नाहीत, ही गंभीर समस्या असल्याचे अहवालातून समोर आले आहे. मुंबईत दर ४ सार्वजनिक शौचालयातील केवळ १ शौचालय स्त्रियांसाठी आहे. ज्या प्रभागामध्ये व्यापारी व सांस्कृतिक कारणांमुळे ये-जा करणाऱ्या रहिवाशांचे प्रमाण अधिक आहे, तिथली स्थिती तर अधिक बिकट आहे.

### निकषांची पूर्तता होत नाही

मुंबईच्या तटीय पाण्याची प्रदूषण पातळी चिंताजनकरीत्या वाढलेली आहे. एकूण आठ सांडपाणी प्रक्रिया केंद्रांपैकी सहा केंद्रांची बीओडी पातळी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निकषाची पूर्तता करत नाही. मिठी नदीत विष्ठा कोलीफार्मची पातळी प्रचंड प्रमाणात वाढली आहे. (५,४०,००० एमपीएन/ १०० मिली) मर्यादेपेक्षा हे प्रमाण खूप जास्त असल्याचे अहवालात म्हटले आहे.

### पुण्य IN SHORT



## प.रे.च्या स्थानकांवर नियंत्रित प्रवेश

। **मुंबई :** पश्चिम रेल्वेवर लवकरच मेट्रो स्थानकांप्रमाणे नियंत्रित प्रवेश प्रकल्प राबवण्यात येणार आहे. यासाठीचा प्रस्ताव पश्चिम रेल्वेकडून रेल्वे बोर्डाकडे पाठवण्यात आला आहे. वाढणाऱ्या प्रवासी संख्येमुळे विविध समस्यांना प्रवाशांना प्रतिदिन सामोरे जावे लागत आहे. यावर रेल्वे प्रशासनाकडून स्थानकांचा पुनर्विकास, त्याअंतर्गत फलाट लांबी वाढवणे, डेक उभारणे, नवीन प्लॅटफॉर्म उभे करणे, भव्य प्रवेशद्वार अशा विविध सुविधा उपलब्ध केल्या जात आहेत. मात्र, भव्य प्रवेशद्वारासोबत आता पश्चिम रेल्वेने मेट्रोप्रमाणे नियंत्रित प्रवेश प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला आहे.